ePaper

हवाई हल्ल्यात मोजतबा खामेनींच्या 8 कुटुंबियांचा मृत्यू !

वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 11 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

पान 2 वरुन...

पुणे पालिका आयुक्तांचे बजेट सादर

महिलांनो; लवकर या.. लवकर जा!

सुनेत्रा पवारांची महिलांसाठी 'खास भेट': कार्यालयीन कामकाज करणाऱ्या महिलांना दिलासा

महाईन्यूज । मुंबई

जागतिक महिला दिन ८ मार्चला साजरा झाला. त्यानंतर विधिमंडळ अधिवेशनात राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार राज्यातील महिला कर्मचाऱ्यांसाठी मोठी घोषणा केली. लवकर या, लवकर जा.. म्हणत महिलांना कामाच्या ठिकाणी लवकर आल्यास लवकर जाण्याची मुभा देण्यात येणार आहे. आम्ही घोषणा करत आहोत की, मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय कर्मचारी महिलांसाठी प्रणाली लागू करण्यात येत आहे.

साखर कारखान्यांचा मुद्दा

राज्यात नवीन उद्योग आणताना राज्यातील या कारखान्यांकडे मायेच्या नजरेने पाहायला पाहिजे. कारखाने का तोट्यात येतात, कारण एमएसपी ठरवण्याचा अधिकार हा केंद्राचा आहे, एमएसपी वाढली पाहिजे. केंद्राने आता इथेनॉल योजना आणली आहे. साखर कारखान्यांनी कर्ज काढलं, कारखाने उभे राहिले, इथेनॉल किती घ्यायचं हेही तेच ठरवातात. आता सरकार म्हणतंय की इथेनॉल हे कारखान्यांकडून ३० टक्के घ्या आणि अन्नधान्यापासून ७० टक्के घ्या, असे म्हणत साखर कारखान्यांचाही मुद्दा सुनेत्रा पवार यांनी उपस्थित केला.

शासकीय नोकरीत असलेल्या महिला सकाळी ९.१५ वाजता कार्यालयात आल्या तर घरी जाताना त्यांना अर्धा तास लवकर सोडण्यात येईल, अशी घोषणा सुनेत्रा पवार यांनी विधानपरिषदेतून केली.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून मी अत्यंत महत्त्वाची घोषणा करत आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. COME EARLY GO EARLY याची घोषणा करत आहोत. त्यानुसार, मुंबई महानगर क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांना सकाळी ९.१५ वाजता कार्यालयात आल्या तर घरी जाताना त्यांना अर्धा तास लवकर सोडण्यात येईल, असे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

सरकारने लाडकी बहीण, लेक लाडकी, अन्नपूर्णा सारख्या योजना आपण आणल्या आहेत. मेट्रोमनी साईड वरून होणारी फसवणूक रोखण्यासाठी देखील कायदा करण्याबाबत प्रयत्न केले जातील. लाडकी बहीण योजना प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. राज्यातील १७ हजार अंगणवाडीसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहितीही सुनेत्रा पवार यांनी दिली.

महिलांसाठी चांगली संधी उपलब्ध करून दिली त्याबाबत आभारी आहे. महिला दिनानिमित्ताने अनेक वरिष्ठ नेत्यांनी सभागृहात भाषण केलं, आपल्या भावना व्यक्त केल्या. काही चांगल्या सूचना यानिमित्ताने पुढे आल्या आहेत. या सभागृहात पुरुष सदस्यांनी देखील भावना व्यक्त केल्या, असे म्हणत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी महिलांच्या प्रश्नासंदर्भाने भाषण केलं.

तुम्ही सभापतींच्या खुर्चीवर बसू शकत नाही; असदुद्दीन ओवैसी

महाईन्यूज । नवी दिल्ली

लोकसभेत सभापतींविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावादरम्यान, एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी म्हणाले, "तुम्हाला सभापतींनी नियुक्त केले आहे. माझ्या मते, तुम्ही तिथे बसून हे कामकाज पुढे चालवू शकत नाही. सभागृहाची भावना लक्षात घेतली पाहिजे." आज (ता. १० मार्च) रोजी लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांच्याविरोधात विरोधकांकडून अविश्वास प्रस्ताव मांडण्यात आला आहे. यावर ११८ सदस्यांनी सह्या केल्या आहेत.

या अविश्वास प्रस्तावावर चर्चा करताना भाजप खासदार जगदंबिका पाल यांनी सभागृहाचे तात्पुरते सभापती म्हणून काम पाहिले. पण यावर विरोधकांनी आक्षेप घेतला आहे.

अविश्वास प्रस्तावावरील चर्चेत बोलताना आणि लोकसभेत उपसभापती नसल्याचा मुद्दा उपस्थित करताना एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी म्हणाले, "महाशय, तुम्ही (भाजप खासदार जगदंबिका पाल) अध्यक्षस्थानी बसले आहेत. तुम्हाला सभापतींनी नियुक्त केले आहे. माझे मत आहे की तुम्ही तिथे बसून हे कामकाज सुरू करू शकत नाही. सभागृहाची भूमिका घेतली पाहिजे. नियम १० संविधानाच्या कलम ९५ आणि ९६ ला मागे टाकू शकत नाही. या सरकारने घटनात्मक गोंधळ घातला आहे."

लोकसभा सभापतींच्या अनुपस्थितीत लोकसभेचे उपसभापती (DEPUTY SPEAKER) सभागृहाचे कामकाज सांभाळतात. जर सभापती आणि उपसभापती दोघेही उपस्थित नसतील, तर सभापतींनी नियुक्त केलेल्या सदस्यांच्या पॅनेलपैकी (PANEL OF CHAIRPERSONS) एका सदस्याकडे ही जबाबदारी सोपवली जाते. हे सदस्य वरिष्ठतेनुसार काम करतात.

पुणे पालिका आयुक्तांचे बजेट सादर

पायाभूत सुविधांसह समाविष्ट गावाच्या विकासावर भर देणारा अर्थसंकल्प

महाईन्यूज । पुणे

पुणे महापालिकेचा २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी १३ हजार ९९५ कोटींचा अर्थसंकल्प आयुक्त नवल किशोर राम यांनी सोमवारी स्थायी समितीला सादर केला. गतवर्षीपेक्षा तब्बल १ हजार ३७७ कोटींनी हा अर्थसंकल्प जास्त आहे. पायाभूत सुविधांसह समाविष्ट ३२ गावांच्या विकासावर यंदाच्या अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. रस्ते, पाणीपुरवठा, घनकचरा विभाग, आरोग्य आणि पर्यावरण विभागासाठी अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद करण्यात आली आहे.

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी), मिळकत कर, बांधकाम शुल्क आणि पाणीपट्टी हे महापालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य चार स्त्रोत आणि ९३४ कोटींचे शासकीय अनुदान या भरवशावर हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. महापालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचे बजेट आयुक्त राम यांनी स्थायीच्या खास बैठकीत अध्यक्ष श्रीनाथ भीमाले यांना सादर केले. यावेळी महापौर मंजूषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृहनेते गणेश बिडकर, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पवनीत कौर आदीं उपस्थित होते. गेली चार वर्षे पालिकेत प्रशासक राज होते. महापालिका निवडणूक झाल्यानंतर आयुक्त नवल किशोर राम यांनी पहिल्यांदाच बजेट सादर केले आहे.

पालिकेचे गेल्या वर्षी २०२५-२६ या वर्षासाठी १२ हजार ६१८ कोटी रुपयांचे बजेट होते. यंदा त्यामध्ये तब्बल १३७७ कोटींनी वाढ झाली आहे. २०२६-२७ च्या बजेटमध्ये सेवकवर्ग खर्च ३ हजार ८८१ कोटी तर भांडवली खर्च ५ हजार ७७३ कोटी रुपये दर्शविला आहे. जीएसटीतून (वस्तू आणि सेवा कर) २ हजार ९१७ कोटी, मिळकतकर ३ हजार ३५२ कोटी, बांधकाम परवानगी आणि विकास शुल्क ३४०६ कोटी, पाणीपट्टीतून ७४१ कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित धरले आहे. शासकीय अनुदान ९३४ कोटी, प्रधानमंत्री आवास योजना ९३ कोटी, इतर जमामधून १ हजार २०३ कोटी, कर्ज/कर्जरोखे ५०० कोटी, असे उत्पन्न अपेक्षित धरले आहे. या चार बाबींवर बजेटचा डोलारा उभा आहे.

पर्यावरण विभागासाठी प्रथमच ५१ कोटींची भरीव तरतूद

पुणे महानगरपालिका आयुक्तांनी सादर केलेल्या बजेटमध्ये पर्यावरण विभागासाठी प्रथमच ५१ कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. शहरातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी नदी स्वच्छता मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. नदीत येणारा कचरा रोखण्यासाठी विविध ठिकाणी फ्लोटिंग ट्रॅश, बॅरियर्स, बायोरेमीडेशन टेक्निक्स, फ्लोटिंग आइसलॅंड, नाल्यामधून नद्यांमध्ये जाणारे सांडपाणी कमी करण्यासाठी विविध ठिकाणी छोट्या क्षमतेचे एसटीपी उभारण्याचीही उपाययोजना राबविली जाणार आहे.

पाणीपुरवठा व्यवस्थापनासाठी आणि मलनिस्सारणासाठी विशेष तरतूद

आयुक्तांनी बजेटमध्ये सर्वाधिक खर्च पाण्याच्या प्रकल्पावर अपेक्षित धरला आहे. त्यात महसुली खर्च १२७४ कोटी, तर भांडवली खर्च ८०२ कोटी अशी एकूण २०७७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. शहरात समान पाणीपुरवठा योजना राबविली जात आहे. त्यामधून पाण्याची गळती रोखण्यासाठी मदत झाली आहे. शहराला खडकवासला धरणातून पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी बदलण्याचे काम केले जाणार आहे. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा पाणी पुरवठ्यासाठी ३०० कोटी रुपयांची जादा तरतूद करण्यात आली आहे. मलनिस्सारणासाठी १२१६ कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती विभागामार्फत तयार केलेल्या सिव्हरेज मास्टर प्लॅननुसार विविध व्यासाच्या मलवाहिन्या बदलण्यासाठी २०८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. पालिका क्षेत्रातील पूरस्थिती नियंत्रणासाठी सीमाभिंत बांधणे या कामासाठी राज्यसरकारकडून २०० कोटींच्या निधीपैकी ३८ कोटींचा निधी पालिकेकडे प्राप्त झाला आहे. या कामातून ८८ ठिकाणी सीमाभिंतीचे काम करण्यात येणार आहे.

पुण्यात 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा देणारा तरुण अटकेत

महाईन्यूज । पुणे

'पाकिस्तान जिंदाबाद' अशा घोषणा दिल्यामुळे पुण्यातील झोपडपट्टी परिसरातून एका २० वर्षीय तरूणाला अटक करण्यात आली आहे. संबंधित घोषणांचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी अटकेची कारवाई केली. या घटनेनंतर परिसरातील मुस्लीम कुटुंबांनी सोमवारचा इफ्तार रद्द केला. या परिसरातील काही हिंदू कुटुंबांनीही आरोपी तरूणाच्या कुटुंबाला आधार दिला आहे. सदर तरूणाने मस्करीत टिप्पणी केली होती, अशी भूमिका काही जणांनी व्यक्त केली आहे.

द इंडियन एक्सप्रेसने यासंदर्भात बातमी दिली आहे. २० वर्षांचा तरूण त्याच्या कुटुंबातील एकटा कमावता व्यक्ती आहे. इलेक्ट्रिशियनचे काम करणाऱ्या या तरूणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यानंतर या तरुणाला अटक करण्यात आली.

आरोपीचे कुटुंबिय आण शेजाऱ्यांनी सांगितले की, तरूणाची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. त्याला त्याच्या मित्राने सदर घोषणा देण्यासाठी उद्युक्त केले आणि त्याचा एडिट केलेला व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला. त्याने त्याच्या विधानाबद्दल आधीच माफी मागितली आहे.

आरोपी तरूणाच्या वडिलांचे दोन वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्याचा मोठा भाऊ दिव्यांग आहे. त्यामुळे या तरूणाला शिक्षण अर्धवट सोडून कामावर जावे लागले. बांधकाम साईटवर तो इलेक्ट्रिशियनचे काम करतो. तरूणाची आई घरकाम करते. द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना त्या म्हणाल्या, "व्हिडीओ पाहिल्यावर तुम्हाला लक्षात येईल. माझ्या मुलाला तसे बोलण्यास भाग पाडले आहे. त्याच्या विधाचे काय परिणाम होतील, याचा त्याला अंदाजही नाही. तो अजून लहान आहे, त्याने माफी मागितली आहे."

हिंदू शेजाऱ्यांनी सांगितले की, सदर आरोपी चांगला मुलगा आहे. तो सकाळी कामाला जातो, सायंकाळी आल्यानंतर घरी आईची मदत करतो. जर त्याची वाईट संगत असती तर आम्हीही त्याला शिक्षा द्यावी, असेच म्हणालो असतो. पण तो चांगला मुलगा आहे. त्याच्याकडून अनवधानाने चूक झाली. आमच्या परिसरात हिंदू आणि मुस्लीम सर्व एकत्रच राहतात.

'तो मुलगा चांगला आहे', शेजाऱ्यांनी घेतली बाजू

रविवारी सदर तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम १९२ आणि १९६ (१) नुसार दोन गटात शत्रुत्व निर्माण करण्यास प्रोत्साहन दिल्याबद्दल एफआयआर दाखल करण्यात आला आहे. हिंदू शेजाऱ्यांनी सांगितले की, तो चांगला आहे. एका बांधकाम साईटवर काम करत असताना सहकाऱ्यांशी बोलत असतानाचा त्याचा व्हिडीओ चित्रित करण्यात आला होता. यावेळी आरोपी तरूणाने पाकिस्तान जिंदाबाद म्हटले होते.

'यूपी पोलिस' बनून व्यापाऱ्याचे अपहरण

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या पथकाने पाठलाग करून चार संशयितांना केली अटक

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

'उत्तर प्रदेश पोलिस' असल्याचे भासवत चार जणांनी एका व्यापाऱ्याचे अपहरण करून ५० लाखांची खंडणी मागितल्याची धक्कादायक घटना रहाटणी येथील शिवराजनगर परिसरात घडली. मात्र, पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखेने तातडीने तांत्रिक तपास करत १०० किलोमीटर पाठलाग करून संगमनेर येथे चारही संशयिताना पकडले आणि अपहृत व्यापाऱ्याची सुखरूप सुटका केली.

सुरेशकुमार बाबूमल जैसवानी (रा. रहाटणी) असे सुटका झालेल्या अपहृत व्यापाऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रहाटणी परिसरात सुरेशकुमार जैसवानी हे त्यांच्या कामानिमित्त बाहेर असताना चार संशयित त्यांच्या जवळ आले. त्यांनी स्वतःला 'उत्तर प्रदेश पोलिस' असल्याचे सांगत चौकशी करायची असल्याचे सांगितले. पोलिस असल्याचा धाक दाखवत त्यांनी जैसवानी यांना गाडीत बसण्यास सांगितले.

अचानक घडलेल्या प्रकारामुळे जैसवानी गोंधळून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. मात्र, एका संशयिताने त्यांच्या दुचाकीला धक्का देत त्यांना खाली पाडले. त्यानंतर संशयितांनी जबरदस्तीने त्यांना कारमध्ये बसवले आणि तेथून पसार झाले. घटनास्थळी काही नागरिक उपस्थित होते. मात्र, संशयित स्वतःला पोलिस असल्याचे सांगत असल्याने कोणीही हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे व्यापाऱ्याला घेऊन पसार होणे सोपे गेले.

दरम्यान, काही वेळातच संशयितांनी जैसवानी यांच्या मोबाईलवरून त्यांच्या भावाला फोन केला. त्यांनी जैसवानी यांचे अपहरण केल्याचे सांगत ५० लाखांची खंडणी मागितली. पैसे दिले नाहीत तर त्यांना ठार मारण्याची धमकीही दिली. या फोननंतर कुटुंबीय घाबरले. त्यांनी पोलिसांना माहिती दिली.

सापळा रचून घेतले ताब्यात

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. जैसवानी यांच्या भावाला विश्वासात घेऊन संशयितांशी फोनवर संपर्क कायम ठेवण्यास सांगण्यात आले. त्याचवेळी मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. कॉल लोकेशनच्या आधारे संशयित शहराबाहेर पळाल्याचे स्पष्ट झाले. तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढत सुमारे १०० किलोमीटरचा पाठलाग केला. तपासादरम्यान संशयित संगमनेर परिसरातून पुढे जात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने सापळा रचत चारही संशयितांना ताब्यात घेत जैसवानी यांची सुखरूप सुटका केली.

घटना सीसीटीव्हीत कैद

रहाटणी परिसरातील एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात अपहरणाची घटना कैद झाली आहे. फुटेजमध्ये संशयित हे व्यापाऱ्याजवळ येऊन स्वतःला पोलिस असल्याचे सांगताना दिसतात. काही क्षणांतच ते जैसवानी यांना जबरदस्तीने कारमध्ये बसवून तेथून निघून जात असल्याचे दिसते.

शहरात श्वान संगोपन केंद्रासाठी प्रभागनिहाय जागा शोधा; महापौर

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आढावा बैठक पार पडली. यावेळी शहरातील भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासोबतच त्यांचे संगोपन, आरोग्य सेवा आणि नागरिकांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण यासाठी ठोस उपाययोजना करा. पिंपरी चिंचवड शहरात श्वान संगोपन केंद्रासाठी प्रभागनिहाय जागा शोधा, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्या वैशाली काळभोर, वैशाली घोडेकर, अर्चना सस्ते, नगरसदस्य अनंत कोऱ्हाळे, मंदार देशपांडे, उत्तम केंदळे, संजय काटे, सुहास कांबळे, उपायुक्त संदीप खोत, अण्णा बोदडे, पशुवैद्यकीय अधिकारी अरुण दगडे तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान महापौर रवि लांडगे यांनी शहरात श्वान संगोपन केंद्र उभारण्याबाबत विशेष भर देत, यासाठी प्रभागनिहाय उपलब्ध जागांची पाहणी करण्याच्या सूचना दिल्या. या केंद्रांच्या माध्यमातून भटक्या श्वानांचे संगोपन, लसीकरण, उपचार तसेच नसबंदी प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविता येईल, असे त्यांनी नमूद केले. यासाठी संबंधित नगरसदस्यांच्या सहकार्याने प्रभागनिहाय योग्य जागा निश्चित करून त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

तसेच शहरातील भटक्या व पाळीव श्वानांची अचूक संख्या, त्यांचे वितरण तसेच नसबंदी आणि लसीकरणाची सद्यस्थिती याबाबत सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल तयार करण्याचे आदेश महापौरांनी दिले. शहरातील नागरिकांकडून येणाऱ्या श्वानांबाबतच्या तक्रारींचे तात्काळ व प्रभावी निवारण करण्यासाठी पशुवैद्यकीय विभागाने समन्वयाने काम करण्याचेही त्यांनी सांगितले.

शहरातील भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे, त्यांचे आरोग्य संवर्धन करणे तसेच नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने अधिक नियोजनबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने काम करावे, असे निर्देशही महापौर रवि लांडगे यांनी यावेळी दिले.

नसबंदी मोहिमेसाठी सध्या विशेष वाहने

यावेळी उपायुक्त संदीप खोत यांनी पशुवैद्यकीय विभागामार्फत करण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शहरात प्राणी जन्मनियंत्रण (ABC) अंतर्गत नसबंदी मोहिमेसाठी सध्या चार विशेष वाहने कार्यरत असून, या वाहनांद्वारे श्वान पकडणे, नसबंदी करणे आणि त्यांना पुन्हा त्यांच्या परिसरात सोडणे ही प्रक्रिया राबविली जात आहे. तसेच जखमी किंवा आजारी प्राण्यांवर उपचार करणे आणि नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्यासाठीही ही वाहने वापरण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले असून, प्राण्यांशी संवेदनशील पद्धतीने वागण्याबाबत विशेष मार्गदर्शनही देण्यात आले आहे. श्वान संगोपन केंद्र उभारण्यासाठी शहरातील काही संभाव्य जागांची प्राथमिक पाहणी देखील करण्यात आली असून, त्याबाबत पुढील कार्यवाही सुरू असल्याचे उपायुक्त खोत यांनी सांगितले.

भूमिका

ट्रिलियन डॉलरच्या दिशेने महाराष्ट्र

महाराष्ट्राचा ताजा अर्थसंकल्प राज्याच्या विकासाची दिशा दाखवणारा असला, तरी त्यातील काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर गंभीर चर्चा होणे आवश्यक आहे. पूर्वी विद्यार्थ्यांना "प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा" असा सुविचार दिला जात असे. आजच्या परिस्थितीत हा विचार सरकारलाही लागू पडतो.

'सुंदर लेणी'ऐवजी 'पायाभूती तयात खोदा' असा बदल केल्यास तो अधिक योग्य वाटतो. कारण सध्याच्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर भर दिलेला दिसतो. गगनचुंबी इमारती, मोठे रस्ते, पूल, जलसंधारण प्रकल्प यांसारख्या योजना या भूमिकेला अधोरेखित करतात. भारतात तसेच महाराष्ट्रातही 'पायाभूत सुविधा विकास' हा सध्या विकासाचा मुख्य मंत्र बनला आहे.

मुळात हा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर करणे अपेक्षित होते. परंतु त्यांच्या अकाली जाण्यामुळे अर्थखाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवले आणि त्यांनीच हा अर्थसंकल्प मांडला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोणत्याही सहकाऱ्याकडे हे खाते न देता ते स्वतःकडे ठेवण्याचा निर्णय हा राजकीयदृष्ट्या सूचक मानला जातो. यामुळे आघाडी सरकारमधील खातेवाटपाच्या मर्यादाही अधोरेखित होतात.

या अर्थसंकल्पातील सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे शेतकरी कर्जमाफी. कर्जमाफीची घोषणा होणार हे आधीच स्पष्ट झाले होते. माजी सनदी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या समितीकडून त्याची चाचपणी सुरू होती. भारतात २००८ साली तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी राष्ट्रीय स्तरावर कर्जमाफी जाहीर केली होती. त्यानंतर महाराष्ट्रात २०१७ मध्ये सुमारे ३१ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात आली, ज्याचा लाभ जवळपास ४४ लाख शेतकऱ्यांना झाला. पुढे २०२४ मध्ये २० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर करण्यात आली आणि ३१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला. आता नव्या कर्जमाफीमुळे सरकारवर पुन्हा मोठा आर्थिक भार पडणार आहे.

कर्जमाफी लोकप्रियतेसाठी उपयुक्त ठरते, परंतु दीर्घकालीन दृष्टीने ती समस्येचे मूळ समाधान नाही. काही शेतकरी प्रत्येक कर्जमाफीचा लाभ घेतात, अशीही उदाहरणे आहेत. त्यामुळे पूर्वीच्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना यावेळी वगळण्याचे धाडस सरकारने दाखवले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. अन्यथा 'कर्ज घ्या आणि माफीची वाट पाहा' अशी मानसिकता तयार होण्याचा धोका आहे. खरे पाहता शेतकऱ्यांना कर्जमाफीपेक्षा त्यांच्या उत्पादनाला योग्य आणि स्थिर बाजारभाव मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. मात्र ते साध्य करणे कठीण असल्याने राजकीय पक्ष कर्जमाफीच्या घोषणांवर भर देताना दिसतात. या अर्थसंकल्पात शेती क्षेत्रासाठी काही सकारात्मक बाबीही आहेत. कृषी मूल्यसाखळी मजबूत करणे, कृषी विद्यापीठांना अधिक सक्षम बनवणे, तसेच शेतीत भांडवली गुंतवणूक वाढवणे यांसारख्या उपायांचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र कर्जमाफीच्या मोठ्या घोषणेच्या गदारोळात या सुधारणा झाकोळल्या जातात. सिंचन क्षेत्रावरही या अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. नवीन सिंचन योजना, नदीजोड प्रकल्प, पाणी वळवण्याच्या योजना यांची घोषणा करण्यात आली आहे. तथापि, या सर्व योजनांनंतरही राज्यातील किती जमीन प्रत्यक्ष सिंचनाखाली आली आहे, याची स्पष्ट माहिती सरकार देत नाही, ही चिंतेची बाब आहे. महाराष्ट्रासमोर आर्थिक आव्हानेही कमी नाहीत. पुढील वर्षापर्यंत राज्याचे एकूण कर्ज ११ लाख कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यावर दरवर्षी सुमारे ६५ हजार कोटी रुपये व्याज द्यावे लागणार आहे. याशिवाय सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि निवृत्तीवेतन यांसारखे हक्काचे खर्च आहेत.

प्रासंगिक »

विषाची परीक्षा

एका गावात एक शेतकरी आपल्या कुटुंबासह राहत होता. एके वर्षी त्या गावात कडाक्याची थंडी पडली. बर्फवृष्टीने सारे काही थिजुन गेले.

लोक आपापल्या घरात शेकोटी पेटवुन उब घेत असत. एकदा तो शेतकरी काही कामासाठी घराबाहेर पडला. घरी परतत असताना त्याला एक साप दिसला. तो साप बर्फात गारठुन स्तब्ध झाला होता. त्याची हालचाल थांबली होती. शेतकऱ्याला त्याच्यावर दया आली. त्याने सापाला उचलले आणि घरी घेऊन गेला. घरी गेल्यावर सापाला शेकोटीजवळ ठेवले. शेकोटीची उब मिळाल्यावर सापाच्या अंगात शक्ति येऊ लागली. शेतकरी दूध घेऊन सापाजवळ गेला. तेवढ्यात सापाने त्याला दंश केला आणि वळवळ करत तेथुन निसटला. सापाच्या विषाने शेतकरी मरण पावला. विषारी सापावर आलेली दया शेतकऱ्याला चांगलीच महागात पडली.

तात्पर्य :

शत्रूची कीव करून त्याला साहित्य पुरविले तर शेवटी पश्चात्ताप करण्याची वेळ येते.

न्यूझीलंडवर एकतर्फी मात करत भारतीय क्रिकेट संघाने टी-ट्वेंटी विश्वकरंडकावर सलग दुसऱ्यांदा आपले नाव कोरले आणि जगासमोर भारतीय क्रिकेटचे वर्चस्व पुन्हा अधोरेखित केले. गेल्या काही वर्षांपासून भारतीय संघ सातत्याने दमदार कामगिरी करत आहे आणि त्यामुळे विजयांची जणू सवयच संघाला लागली आहे.

क्रिकेटविश्वावर भारताचे निर्विवाद वर्चस्व

टी-ट्वेंटी प्रकारातील सलग दोन विश्वविजेतेपदे, एकदिवसीय क्रिकेटमधील चॅम्पियन्स करंडक, १९ वर्षांखालील विश्वकरंडक आणि महिला संघाने मिळवलेले यश – या सर्व कामगिरीकडे पाहिले तर गेल्या अठरा महिन्यांत भारतीय क्रिकेटने जागतिक स्तरावर अभूतपूर्व छाप पाडली आहे.

या यशामागे केवळ एखाद्या खेळाडूची चमक नाही, तर संघभावना, नियोजनबद्ध तयारी आणि खेळात केलेली मोठी गुंतवणूक यांचा मोठा वाटा आहे. प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेणे, त्यांना योग्य संधी देणे, पोषक वातावरण निर्माण करणे आणि क्रिकेटची बाजारपेठ विकसित करणे – या सर्व गोष्टींमुळे भारताने यशाची अखंड मालिका निर्माण केली आहे. एकेकाळी एखाद्या स्टार खेळाडूवर अवलंबून असलेला भारतीय संघ आता पूर्णपणे सांघिक कामगिरीवर विश्वास ठेवून मैदानात उतरतो, हे या विजयातून पुन्हा स्पष्ट झाले.

या स्पर्धेत भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण खेळ दाखवला. स्पर्धेच्या उत्तरार्धात तर भारतीय खेळाडूंनी जवळपास प्रत्येक सामन्यावर आपले पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले. अंतिम सामन्यातही त्याचीच पुनरावृत्ती झाली. भारतीय फलंदाजांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजीवर तुटून पडत तब्बल २५५ धावांचा भक्कम डोंगर उभारला. टी-२० क्रिकेटमध्ये मोठ्या धावसंख्यांचा पाठलाग करणे आता अवघड राहिले नसले तरी भारतीय गोलंदाजांनीही आपली ताकद दाखवून दिली. जसप्रीत बुमराह, हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांनी अचूक मारा करत न्यूझीलंडचा डाव रोखून धरला आणि आक्रमक फलंदाजीइतकीच प्रभावी गोलंदाजीही विजयासाठी तितकीच महत्त्वाची असते, हे सिद्ध केले.

या स्पर्धेत संजू सॅमसनची कामगिरी विशेष ठरली. अखेरच्या तिन्ही सामन्यांत त्याने मिळवलेला सूर भारताच्या विजयगानाचा मुख्य आधार ठरला. काही काळापूर्वी त्याची कामगिरी साधारण वाटत होती; मात्र कठोर परिश्रम आणि अनुभवी खेळाडूंच्या मार्गदर्शनामुळे त्याने स्वतःला नव्याने सिद्ध केले. त्याची ही झेप अनेक तरुण खेळाडूंना प्रेरणा देणारी ठरेल.

गेल्या काही वर्षांत भारतीय संघाने वैयक्तिक विक्रमांपेक्षा संघाच्या विजयाला प्राधान्य देण्याची संस्कृती रुजवली आहे. त्यामुळे प्रत्येक खेळाडूने आपल्या भूमिकेनुसार जबाबदारी पार पाडत या यशात मोलाचा वाटा उचलला. परिणामी या विश्वकरंडक विजयात एखादा खेळाडू नव्हे, तर संपूर्ण भारतीय संघच खरा 'स्टार' ठरला आहे. कोट्यवधी भारतीयांसाठी हा केवळ एक विजय नाही, तर दीर्घकाळाच्या मेहनतीतून साकारलेला अभिमानाचा सुवर्णक्षण आहे.

।। अभंगवाणी ।।

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥

आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मिरजमध्ये महाविकास आघाडीची सत्ता

नाट्यपूर्ण घडामोडीनंतर पंचायत समितीवर मिळवले वर्चस्व

महाईन्यूज । सांगली

नाट्यपूर्ण घडामोडीनंतर मिरज पंचायत समितीची सत्ता महाविकास आघाडीच्या हाती आली. सभापती निवडीमध्ये महाविकास आघाडीने शिवसेना शिंदे गटाला सोबत घेउन सत्तांतर घडवले. आमदार सुरेश खाडे यांच्या नेतृत्वाखालील भाजपला सत्तेच्या जवळ पोहचूनही पदाधिकारी निवडीत पराभूत व्हावे लागले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या तन्वी कमलेकर या २१ वर्षाच्या तरूणीच्या गळ्यात सभापती पदाची माळ पडली.

भाजपचे आमदार खाडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपने मिरज तालुक्यातील पंचायत समितीच्या २२ पैकी १० जागा पटकावत सर्वात मोठा पक्ष भाजप ठरला होता. मात्र, अन्य पक्षांनी भाजपविरोधात निवडणूक लढवून १२ जागावर विजय संपादन केला होता. यामध्ये काँग्रेस ३, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ३, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट ४ आणि शिवसेना शिंदे गट २ असे संख्याबळ होते.

दरम्यान, कोणत्याही स्थितीत मैदानात उतरून विजय संपादन करायचा या प्रयत्नात असलेल्या

भाजपकडून सभापती पदासाठी राणी भोरे व उपसभापती पदासाठी पांडूरंग पाटील यांची उमेदवारी दाखल करण्यात आली. तर विरोधकांकडून सभापती पदासाठी काँग्रेसच्या कुमारी कमलेकर व उपसभापती पदासाठी शिवसेनेच्या श्रीमती ललिता शेजूळ यांची उमेदवारी दाखल करण्यात आली. सभागृहात मतदान झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी उपजिल्हाधिकारी उत्तम दिघे यांनी काँग्रेसच्या कमलेकर व शिवसेनेच्या शेजूळ यांना ११ विरुद्ध 10 मते पडल्याने विजयी झाल्याचे जाहीर केले.

सभापती व उपसभापती निवड जाहीर होताच खासदार विशाल पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उपाध्यक्ष मनोज शिंदे, काँग्रेसचे अण्णासाहेब कोरे, शिवसेनेचे प्रा. मोहन वनखंडे आदींनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

भाजप जत तालुक्यापुरती मर्यादित राहिली असून महापालिकेत मागच्या दाराने त्यांनी सत्ता हस्तगत केली आहे.आता लोकांनी नाकारलेल्या भाजपच्या पराभवाची सुरूवात झाली असून याचा पुढचा टप्पा जिल्हा परिषद असेल असे मत खासदार विशाल पाटील यांनी मिरज पंचायत समितीतील महाविकास आघाडीच्या विजयानंतर व्यक्त केले.

नूतन सभापती तन्वी कमलेकर या नरवाड येथील रहिवासी असून त्या अद्याप सांगलीतील चिंतामण व्यापार महाविद्यालयात व्यवस्थापन शास्त्राचे शिक्षण घेत आहेत. जिल्ह्यातील मोठ्या तालुक्याच्या सभापती पदाची संधी मिळाली असून सर्वांना सोबत घेउन आपण कामकाज करणार असल्याचे कुमारी कमलेकर यांनी सांगितले.

महाविकास आघाडीचा आनंदोत्सव

सभापती व उपसभापती निवडीसाठी झालेल्या बैठकीस शिवसेनेचे पांडूरंग इंगळे हे अनुपस्थित राहिले. कालपासून ते संपर्काच्या बाहेर होते. ते बेपत्ता झाल्याची तक्रारही सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात देण्याचे प्रयत्न सोमवारी झाले होते. मात्र, २४ तास झाल्यानंतरच याबाबतची तक्रार दाखल करण्यात येईल असे सांगून नातेवाईकांना परत पाठविण्यात आले. यामुळे मिरज पंचायत समिती पदाधिकारी निवडीकडे जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले होते. पदाधिकारी निवडीत भाजपला पराभूत करून महाविकास आघाडीने शिवसेना शिंदे गटाच्या मदतीने विजय संपादन केल्यानंतर कार्यकर्त्यांनी पंचायत समितीसमोर गुलालाची उधळण करत आणि फटाके फोडत आनंदोत्सव साजरा केला.

दहा वर्षे पूर्ण झालेल्या बँक संचालकांना 'निवृत्तीचे नारळ!'

महाईन्यूज । मुंबई

राज्यातील जिल्हा सहकारी किंवा नागरी सहकारी बँकांमधील ज्या संचालकांचा कार्यकाळ ऑगस्ट २०२५मध्ये १० वर्षे किंवा त्याहून अधिक झाला आहे, त्या संचालकांवर आता 'निवृत्तीचे नारळ' स्वीकारण्याची वेळ आली आहे. या संदर्भातील कार्यवाही सुरू झाली आहे.

यासंदर्भात शासनाच्या सहकार-पणन व वस्त्रोद्योग विभागाने राज्याच्या सहकार आयुक्तांना ९ मार्च रोजी एक पत्र पाठविले असून त्यातून वरील बाब स्पष्ट झाली आहे. केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाने गतवर्षी बँकिंग अधिनियमात केलेल्या सुधारणांतील तरतुदींनुसार वर्षानुवर्षे जिल्हा सहकारी किंवा नागरी सहकारी बँकांमध्ये ठाण मांडून बसलेल्या अनेक संचालकांवर या नव्या तरतुदीमुळे गंडांतर येणार आहे.

१० वर्षे पूर्ण झालेल्या बँक संचालकांच्या अपात्रतेसंबंधी मागील काही महिन्यांपासून सहकार क्षेत्रामध्ये चर्चा सुरू होती. अधिनियमातील दुरुस्तीची अंमलबजावणी पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू होते किंवा कसे, याबाबतीत संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर शासनाने फेब्रुवारी महिन्यात रिझर्व बँकेला एक पत्र पाठविले होते. त्या पत्राला उत्तर देताना या बँकेने अधिनियमांतील दुरूस्तीबाबत स्पष्टीकरण दिले आहे. कोणत्याही सहकारी बँकेच्या संचालकांच्या कार्यकाळास १ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यानंतर दहा वर्षे पूर्ण होतील ते या पदावर राहण्यास अपात्र असतील, असे त्यात नमूद करण्यात आले आहे.

या दुरुस्तीसंबंधी सहकार खात्याची धारणा वरील प्रमाणेच होती; परंतु त्यावरून काही बँकांच्या संचालकांनी कोर्टकचेऱ्या सुरू केल्यामुळे सहकार खात्याने बँकेकडून स्पष्टीकरण मागविले होते. ते प्राप्त झाल्यानंतर सहकार विभागाने सहकार आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात वरील तरतुदीची अंमलबजावणी करण्याची सूचना दिली आहे.

ठाण मांडून बसलेल्या संचालकांवर गंडांतर..!

यासंदर्भात शासनाच्या सहकार-पणन व वस्त्रोद्योग विभागाने राज्याच्या सहकार आयुक्तांना ९ मार्च रोजी एक पत्र पाठविले असून त्यातून वरील बाब स्पष्ट झाली आहे. केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाने गतवर्षी बँकिंग अधिनियमात केलेल्या सुधारणांतील तरतुदींनुसार वर्षानुवर्षे जिल्हा सहकारी किंवा नागरी सहकारी बँकांमध्ये ठाण मांडून बसलेल्या अनेक संचालकांवर या नव्या तरतुदीमुळे गंडांतर येणार आहे. १० वर्षे पूर्ण झालेल्या बँक संचालकांच्या अपात्रतेसंबंधी मागील काही महिन्यांपासून सहकार क्षेत्रामध्ये चर्चा सुरू होती. अधिनियमातील दुरुस्तीची अंमलबजावणी पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू होते किंवा कसे, याबाबतीत संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर शासनाने फेब्रुवारी महिन्यात रिझर्व बँकेला एक पत्र पाठविले होते. त्या पत्राला उत्तर देताना या बँकेने अधिनियमांतील दुरूस्तीबाबत स्पष्टीकरण दिले आहे. कोणत्याही सहकारी बँकेच्या संचालकांच्या कार्यकाळास १ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यानंतर दहा वर्षे पूर्ण होतील ते या पदावर राहण्यास अपात्र असतील, असे त्यात नमूद करण्यात आले आहे.

शेतमालाच्या भावासाठी 'बटाटा आंदोलन'

संसदेत समाजवादी पक्षाच्या खासदारांचा सरकारविरोधात अनोखा निषेध!

महाईन्यूज । नवी दिल्ली

शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा या मागणीसाठी समाजवादी पक्षाच्या खासदारांनी मंगळवारी संसदेबाहेर 'बटाटा आंदोलन' केले. समाजवादी पक्षाच्या खासदारांनी संसदेच्या आवारात बटाटे आणून निषेध नोंदवला. त्यांनी "आलू का उचित मूल्य दिलाओ, किसानों को यूं न सताओ" (बटाट्याला योग्य भाव द्या, शेतकऱ्यांना त्रास देऊ नका) असे लिहिलेले बॅनर हातात घेऊन सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कृषोन्नती योजना आणि प्रधानमंत्री-धन धान्य कृषी योजनेच्या पुनर्रचनेबाबतच्या प्रश्नांना उत्तरे दिली. निवडणूक आयोगावर 'मत चोरी' केल्याचा आरोप करत विरोधी पक्षाच्या खासदारांनी प्रश्नोत्तराच्या तासात सतत घोषणाबाजी केली. त्यामुळे लोकसभेचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दरम्यान, सभागृहाचे कामकाज सुरळीत चालल्यास लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्यासाठी विरोधी पक्ष ठराव मांडेल, असे काँग्रेस खासदार के. सुरेश यांनी सांगितले. त्यानंतर बिर्ला यांच्याविरोधात अखेर अविश्वास प्रस्ताव मांडण्यात आला. या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी १० तासांचा वेळ देण्यात आला आहे.



चर्चेसाठी १० तासांचा वेळ

अध्यक्षस्थानी असलेल्या भाजपचे खासदार जगदंबिका पाल यांनी सदस्यांना कळवले की, ठरावावरील चर्चेसाठी १० तासांचा वेळ देण्यात आला आहे. त्यांनी खासदारांना आपले भाषण केवळ प्रस्तावाच्या विषयापुरते मर्यादित ठेवण्याचे आणि वेळेचे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच, सभापतींनी विरोधकांना ठराव मांडण्याची परवानगी देऊन चर्चेची प्रक्रिया सुलभ करण्यात उदारता दाखवली असल्याचेही पाल यांनी नमूद केले.

११८ खासदारांच्या अविश्वास प्रस्तावावर सह्या

सोमवारी (९ मार्च) सभागृहाचे कामकाज वारंवार तहकूब होत असल्याने कनिष्ठ सभागृहात ठराव मांडता आला नाही, असे काँग्रेसचे खासदार के. सुरेश यांनी सांगितले. त्यांनी एएनआयला दिलेल्या माहितीनुसार, "जर सभागृह सुरळीत चालले तर आज आम्ही हा प्रस्ताव मांडू. काल सभागृहाचे कामकाजच झाले नाही." विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सभागृहात बोलू दिले नाही, असा आरोप करत सभापतींनी पक्षपाती वर्तन केल्याचे सांगत ११८ विरोधी खासदारांनी या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हवाई हल्ल्यात मोजतबा खामेनींच्या 8 कुटुंबियांचा मृत्यू!

महाईन्यूज । इराण

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा अमेरिका- इस्त्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्यात मृत्यू झाला. अयातुल्ला यांच्या मृत्यूनंतर इराणने मुलगा मोजतबा खामेनी याची सर्वोच्च नेतेपदी निवड केली आहे. अमेरिकेने या निवडीवरुन नाराजी व्यक्त केली असली तरी या नाराजीला न जुमानता इराणच्या संसदेत एकमताने मोजतबा यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. वडील अयातुल्ला यांचा मृत्यू झाला त्याच हल्ल्यात मोजतबा यांनी आई, बायको आणि मुलाला देखील गमावल्याची माहिती आता समोर आली आहे.

निवडीवर अमिरेका – इस्त्रायल नाराज

मोजतबा यांची सर्वोच्च नेतेपदी निवड झाल्यानंतर चीन आणि रशियांकडून स्वागत करण्यात आले आहे. पण, अमेरिकेकडून या निवडीवर नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. ट्रम्प यांनी तर पुन्हा एकदा इराणला इशारा देत मत विचारात न घेतल्यास नवा नेता कितीकाळ पदावर असेल सांगता येत नाही, असे वक्तव्य केले आहे. तसेच, इस्त्रायलकडून देखील पुन्हा हल्ला करण्याची धमकी देण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय माध्यमांनी प्रसिद्ध केलेल्या वृत्तांनुसार, २८ फेब्रुवारी अमेरिका- इस्त्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्यात मोजतबा यांची पत्नी जाहरा हदाद अदेल आणि दोन मुलापैकी एका मुलाचा मृत्यू झाला आहे. मोजताबा यांना एकूण तीन आपत्य होती. पैकी दोन मुले आणि एक मुलगी आहे. दरम्यान. यापैकी एका मुलाचा मृत्यू झाल्याचे इराणच्या माध्यमांनी म्हटले आहे. मोजतबा यांनी या हल्ल्यात बायकोसह मुलालाही गमावल्याचे सांगितले जात आहे.

सर्वोच्च नेते अयातुल्ला यांचा हल्ल्यात मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर त्यांची पत्नी व मोजतबा यांची आई मानसोरेह बागेरजादेह यांचाही मृत्यू झाल्याची माहिती आहे. त्यामुळे मोजतबा यांच्या घरातील एकूण चार लोकांचा या हवाई हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. याशिवाय कुटुंबातील आणखी चार सदस्यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त देखील आहे पण, याची खात्रीलायक माहिती अद्याप समोर आलेली नाही.

पण, इराणी माध्यमांनी केलेल्या दाव्यानुसार, हवाई हल्ल्यात मोजतबा यांची बहीण, भाचा, भाची आणि भावोजींचा देखील मृत्यू झाला आहे. यामुळे मोजतबा यांच्या घरातील एकूण आठ लोकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे.

भाईजानचं चाहत्यांना गिफ्ट!

साऊथच्या दोन अभिनेत्रीसोबत दिसणार



अभिनेता सलमान खान याचा मोठा चाहतावर्ग आहे. अनेक बॉलिवूडमध्ये अनेक सुपरहिट सिनेमे दिले आहेत. दरम्यान सलमान खान कोणत्या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येईल? याची उत्सुकता चाहत्यांना लागली होती. दरम्यान अशातच आता सलमानच्या नव्या प्रोजेक्टबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. लवकरच त्याचा नवीन सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अभिनेता सलमान खान सध्या अनेक मोठ्या बजेटच्या चित्रपटांच्या तयारीत व्यस्त आहे. 'सिकंदर' या चित्रपटात अभिनेत्री रश्मिका मंदाना हिच्यासोबत काम केल्यानंतर आता तो आणखी एका नव्या प्रकल्पासाठी चर्चेत आला आहे. या आगामी पॅन-इंडिया चित्रपटात दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील दोन लोकप्रिय अभिनेत्री नयनतारा आणि समंथा रूथ प्रभू दिसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या चित्रपटात सलमान खान आणि नयनतारा पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत. २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जवान' या चित्रपटाद्वारे नयनताराने हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. या चित्रपटाचे दिग्दर्शन दाक्षिणात्य दिग्दर्शक वामशी पैदिपल्ली करणार आहेत. दिल राजू यांच्या निर्मिती संस्थेतर्फे हा चित्रपट साकारला जाणार असून, वामशी पैदिपल्ली यांचा हा पहिलाच हिंदी चित्रपट ठरण्याची शक्यता आहे. याशिवाय अभिनेत्री समंथा रूथ प्रभूदेखील या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसू शकते, अशीही चर्चा आहे. त्यामुळे चाहत्यांना आता या सिनेमाची उत्सुकता लागली आहे. या सिनेमात नक्की काय असेल, कथा कोणती असेल, कोण कलाकार असतील याची उत्सुकता लागली आहे. तसंच चाहते सलमान नयनताराची जोडी पाहण्यास उत्सुक आहेत.

"तिशीच्या आत लग्न झालं पाहिजे"

तेजश्रीचं लग्नाबद्दल स्पष्ट मत

मराठी इंडस्ट्रीमधील लोकप्रिय अभिनेत्री तेजश्री प्रधान कायम चर्चेत असते. सिनेमा, मालिका आणि नाटक या तिन्ही माध्यमात काम करत तेजश्रीने स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ती कायमच तिची मतं स्पष्टपणे मांडते. तिची एक जुनी मुलाखत चर्चेत आहे. या मुलाखतीत तिने लग्नाबद्दल भाष्य केलं आहे.

तेजश्रीने झी 24 तासला मुलाखत दिली होती. यावेळी तिला लग्नाचं योग्य तिशीच्या आधी की नंतर ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर तेजश्रीने तिचं मत मांडलं.

"मला असं वाटतं की, तुमची जेव्हा योग्य वेळ असेल आणि जेव्हा तो योग्य दिवस येईल तेव्हा ती व्यक्ती तुमच्यासमोर येऊन उभी राहील असं ती म्हणाली. " तर लग्नाच्या योग्य वयाबद्दल तिने तिचं मत मांडलं.

ती म्हणाली की,"ते प्रत्येकावर अवलंबून आहे. आजच्या काळात तर करिअर प्रत्येकासाठी महत्त्वाचं झालं आहे त्यामुळे वाटतं की फार क्वचित लोक 30 च्यानंतर लग्न करतायेत. मला वैयक्तिक रित्या वाटतंय की 30 च्या आधी लग्न झालं पाहिजे. म्हणून मी ते केलं. तेव्हा टिकलं नाही टिकलं नंतरची गोष्ट. पण मला वाटत तिशीच्या आधी लग्न झालं पाहिजे."

याच कारण तिने सांगितलं की,"तिशीपर्यंत तुम्ही चांगले मोल्ड होऊ शकता. त्यानंतर तुमचा प्रवास स्वतंत्र सुरु होतो. तुम्ही आयुष्यात पुढे जाता. 30 नंतर स्वतःमध्ये बदल करणं कठीण होतं. त्यामुळे आपण म्हणतो ना माती ओली असेपर्यंत आकार द्यावा. तसं आहे ते."

'सितारे जमीन पर' ओटीटीवर रिलीज होणार

आमिर खानच्या काही लोकप्रिय चित्रपटांपैकी एक म्हणजे 'तारे जमीन पर'. हा चित्रपट प्रेक्षकांना खूपच आवडला होता. २००७ मध्ये आलेल्या 'तारे जमीन पर'चा गेल्यावर्षी 'सितारे जमीन पर' हा सीक्वेल आला. आर. एस. प्रसन्न दिग्दर्शित हा चित्रपट जून २०२५ मध्ये चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. नऊ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर 'सितारे जमीन पर' अखेर एका ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रेक्षकांना पाहता येणार आहे. सितारे जमीन पर' हा SONYLIV वर पाहता येणार आहे. SONYLIV ने दिलेल्या माहितीनुसार, 'सितारे जमीन पर' हा SONYLIV वर थेट प्रदर्शित होणारा पहिलाच हिंदी चित्रपट ठरणार आहे. त्यामुळे SONYLIV साठी हा एक चित्रपटाच्या ओटीटी प्रीमियरसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. चित्रपटगृहांत रिलीज झाल्यानंतर महिनाभराने, आमिरने हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज करण्याऐवजी वेगळा प्रयोग केला. त्याने हा चित्रपट त्याच्या YOUTUBE वरील 'AAMIR KHAN TALKIES' या चॅनेलवर पे-पर-व्यूद्वारे रिलीज केला. यामध्ये प्रेक्षकांना १०० रुपये भरून चित्रपट पाहता आला. त्यावेळी आमिर खानने सिनेमा अधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि डिजिटल प्रीमियरच्या नव्या पद्धतीचा प्रयोग करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं सांगितलं होतं.

वर्ल्ड चॅम्पियन कॅप्टनचं जंगी स्वागत

विश्वचषक जिंकल्यानंतर कॅप्टन सूर्यासाठी चाहत्यांची प्रचंड गर्दी

महाईन्यूज । मुंबई

कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने मायदेशात टी-२० विश्वचषक २०२६ चं जेतेपद जिंकलं. अहमदाबादमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंड संघाचा तब्बल ९६ धावांनी पराभव केला. यासह टीम इंडियाने विक्रमी तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषकाचं जेतेपद पटकावलं आहे. या विजयानंतर संघाने एकत्र वर्ल्डकप जिंकल्याचा आनंद साजरा केला आणि सर्व खेळाडू आपआपल्या घरी परतले आहे. यादरम्यान सूर्यकुमार यादवचं घरी परतल्यानंतर खास स्वागत करण्यात आलं, ज्याचा व्हीडिओ समोर आला आहे.

सूर्याच्या मराठीने वेधलं लक्ष

यादरम्यान मराठी वृत्तवाहिन्यांशी संवाद साधताना सूर्या मराठीत बोलताना दिसला. सूर्या यादरम्यान म्हणाला, "चेंबूरपासून क्रिकेट प्रवासाला सुरूवात झाली होती आणि आता टी-२० विश्वचषक जिंकून इथे येऊन छान वाटतंय. भारतात वर्ल्डकप जिंकलो यामुळे अजून छान वाटतंय." यादरम्यान पुढची रणनिती काय असेल असं विचारल्यानंतर सूर्या म्हणाला, "आता घरी जाणार जेवणार आणि दोन दिवस मस्त झोपणार" असं सूर्याने मजेत म्हटलं.

सूर्यकुमार यादव हा भारताला टी-२० विश्वचषक जिंकून देणारा तिसरा कर्णधार ठरला. सूर्या मुंबईत चेंबूरमध्ये राहतो. चेंबूरमध्ये पोहोचल्यानंतर सर्वात आधी त्याचं औक्षण करण्यात आलं, यानंतर शाल व फुलं देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. सूर्याचं ढोलताश्यांच्या गजरात स्वागत करण्यात आलं होतं.. सूर्याच्या या स्वागताचा व्हीडिओ सध्या सोशल मीडियावर पाहायला मिळत आहे. सूर्याचं स्वागत करण्यासाठी अनेक चाहते उपस्थित होते. कोणी सूर्याबरोबर फोटो काढत होते, तर कोणी सूर्याचा बॅटवर ऑटोग्राफ घेताना दिसले.

सूर्याने वर्ल्डकप विजयानंतर पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत म्हणाला, "देशासाठी टी-२० विश्वचषक जिंकून छान वाटतंय. २०२४ आणि आता २०२६ मध्ये लागोपाठ ट्रॉफी जिंकून छान वाटतंय. २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर हेच ठरवलं होतं की मायदेशात जेव्हा टी-२० विश्वचषक होईल तो जिंकला तर आनंदाची गोष्ट असेल. आता संघाचं पुढचं लक्ष्य भारताला ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून हे असेल. सध्याच्या घडीला भारतीय संघ चांगल्या लयीत आहे. त्यामुळे देशासाठी सर्वाधिक ट्रॉफी जिंकून देण्याचा माझा भविष्यात प्रयत्न असेल.'

रिंकू सिंहची वडिलांच्या निधनानंतर भावुक करणारी पोस्ट

महाईन्यूज । नवी दिल्ली

संपूर्ण देश टी-२० विश्वचषकातील भारतीय क्रिकेट संघाच्या विजयाचा आनंद साजरा करत आहे. तर रिंकू सिंहसाठी विश्वचषक जिंकल्याचा आनंद असतानाही दु:खाचा मोठा डोंगरदेखील आहे. टी-२० विश्वचषक सुरू असताना रिंकू सिंहच्या वडिलांचं दीर्घ आजारामुळे निधन झालं. आता टी-२० विश्वचषक विजयानंतर रिंकू सिंहने आपल्या दिवंगत वडिलांच्या आठवणीत भावुक पोस्ट शेअर केली आहे.

वडिलांच्या निधनानंतर पुन्हा टी-२० विश्वचषकासाठी रिंकू सिंह सामील झाला होता. यादरम्यान त्याने वडिलांच्या निधनाबाबत कोणतीच पोस्ट केली नव्हती. पण विजयानंतर आता रिंकूने पहिल्यांदाच सोशल मीडियावर आपल्या वडिलांबद्दलच्या भावना शेअर केल्या आहेत. यादरम्यान रिंकूने वडिलांबरोबरचा नव्या कारबरोबरचा एक फोटो शेअर केला आहे. रिंकू सिंह वडिलांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठीच पुन्हा टी-२० विश्वचषक संघात परतला होता. टी-२० विश्वचषक देशासाठी रिंकूने जिंकून द्यावा, अशी त्याच्या वडिलांची इच्छा होती. पण वडिलांची इच्छा पूर्ण झाल्यानंतर हा आनंद साजरा करण्यासाठी वडील सोबत नसल्याचं दु:ख रिंकूने या पोस्टमध्ये बोलून दाखवलं आहे.

रिंकूने वडिलांसाठी केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे, "मी कधीच इतका वेळ तुमच्याशी न बोलता राहिलेलो नाही. तुमच्याशिवाय पुढचं आयुष्य कसं असेल मला माहित नाही... पण मला प्रत्येक पावलावर तुमची गरज भासेल."

रिंकू सिंहने पोस्टमध्ये पुढे लिहिलं, "तुम्ही मला शिकवलंत की कर्तव्य सर्वात आधी येतं, म्हणून मी मैदानावर तुमचं स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करत होतो. आता तुमचं स्वप्न पूर्ण झालं आहे, पण तुमची आज कमी भासतेय, तुम्ही असतात तर बरं झालं असतं. आनंदाच्या प्रत्येक लहान-मोठ्या क्षणी मला तुमची खूप आठवण येईल. बाबा...."

रिंकू सिंहने वडिलांसाठी शेअर केलेल्या पोस्टने सर्वांनाच भावुक केलं आहे. रिंकूच्या या पोस्टवर अनेक क्रिकेटपटू व चाहत्यांना कमेंट करत त्याला धीर दिला आहे. टी-२० विश्वचषकात रिंकू सिंहने भारतासाठी फक्त पाच सामने खेळले. नेदरलँड्स आणि पाकिस्तानविरुद्धच्या शेवटच्या डावात त्याने चौकारांची फटकेबाजी करत आणि धावसंख्येत महत्त्वपूर्ण योगदान दिलं. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवानंतर संजू सॅमसनला संघात स्थान दिल्याने रिंकूला प्लेईंग इलेव्हनबाहेर बसावं लागलं.

प्लेईंग इलेव्हनमध्ये नसला तरी रिंकूने प्रत्येक सामन्यात आपल्या क्षेत्ररक्षणाने आणि चपळाईने संघाला पाठिंबा दिला. वडिलांच्या निधनानंतरही, तो वेस्ट इंडिजविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यापूर्वी पुन्हा संघात सामील झाला. त्याचे वडील व्हेंटिलेटरवर असल्याचे कळल्यानंतर तो यापूर्वी घरी गेला होता, परंतु झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यापूर्वी तो पुन्हा टीम इंडियामध्ये सामील झाला.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। बुधवार ।
दि. 11 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



हिंजवडी आयटी 'फ्रेशर्स' फसवणूक प्रकरणी 'एसआयटी'

मुख्यमंत्र्यांचे आदेश; आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पुणे जिल्ह्यातील हिंजवडी आयटी पार्कमधील 'फ्लायनॉट सास प्रा. लि.' (FLYNAUT SAAS PVT. LTD.) या कंपनीने शेकडो सुशिक्षित बेरोजगार तरुण पदवीधरांना नोकरीचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांना गंडवल्याचे प्रकरण समोर आले होते. या गंभीर विषयावर आमदार शंकर जगताप यांनी आक्रमक भूमिका घेत विधानसभेत (दि . 10) तारांकित प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या या पाठपुराव्याची दखल घेत आता या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

> आयटी क्षेत्रातील तरुणांची होणारी ही फसवणूक अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणाचा तपास केवळ कागदावर राहू नये, तर प्रत्येक पीडित विद्यार्थ्याला त्याचे हक्काचे पैसे परत मिळावेत आणि अशा प्रकारे फसवणूक करणाऱ्या टोळ्यांवर जरब बसवावी, हीच माझी प्रमुख मागणी आहे. या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे एसआयटीच्या माध्यमातून आता या प्रकरणाचा छडा लागेल."असा विश्वास आहे.
>
> – शंकर जगताप, आमदार,चिंचवड विधानसभा मतदारसंघ.

पुणे जिल्ह्यातील हिंजवडी आयटी पार्कमधील 'फ्लायनॉट सास प्रा. लि.' (FLYNAUT SAAS PVT. LTD.) या कंपनीने शेकडो सुशिक्षित बेरोजगार तरुण पदवीधरांना नोकरीचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांना गंडवल्याचे प्रकरण समोर आले होते. या गंभीर विषयावर आमदार शंकर जगताप यांनी आक्रमक भूमिका घेत विधानसभेत (दि . 10) तारांकित प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या या पाठपुराव्याची दखल घेत आता या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

आमदार शंकर जगताप यांनी तारांकित प्रश्नाच्या (प्रश्न क्रमांक २७८६८) माध्यमातून हिंजवडी आयटी पार्कमधील 'फ्लायनॉट सास प्रा. लि. कंपनीने बेरोजगार तरुण पदवीधारकांच्या केलेल्या फसवणुकीचा मुद्दा सभागृहासमोर मांडला होता. याविषयी माहिती देताना त्यांनी की, हिंजवडी आयटी पार्क येथील 'फ्लायनॉट सास प्रा. लि. या कंपनीने ऑगस्ट २०२५ मध्ये वेगवेगळ्या कन्सल्टीच्या माध्यमातून फ्रेशर्स इंजिनीअर उमेदवारांना मोठ्या वार्षिक पगाराचे अमिष दाखवले.

तसेच उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात आगऊ रक्कम स्वीकारून त्यांना कामाला लावतो, अस सांगून आणि विश्वास संपादन केला. नियुक्तीपूर्वी ट्रेनिंग आणि इतर कारणांसाठी प्रत्येक विद्यार्थ्याकडून १ लाख ते २.५० लाख रुपयांपर्यंतची रक्कम कंपनीच्या बँक खात्यावर भरून घेण्यात आली. त्यानंतर काही महिने ऑनलाइन काम करून घेतले. परंतु प्रत्यक्षात पगार दिला नाही. शेवटी पात्रता परीक्षा किंवा इंटरव्ह्यूमध्ये नापास झाल्याचे कारण देऊन अनेक विद्यार्थ्यांना कंपनीत रुजू करून घेण्यास नकार दिला.

सोबतच फ्रेशर्स उमेदवारांची कोट्यावधी रुपयाची आर्थिक फसवणूक केली. या प्रकरणात हिंजवडी पोलीस स्टेशन येथे उपेश रंजीत पाटील आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांना विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची गांभीर्यता शासनाच्या निदर्शनास आणून दिली.

आरोपींची सव्वा कोटींची मालमत्ता जप्त

हिंजवडी आयटी पार्क येथील या फसवणूक प्रकरणात केवळ गुन्हे दाखल करून न थांबता, पीडित विद्यार्थ्यांची रक्कम परत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने कठोर पवित्रा घेतला आहे असे मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. या आतापर्यंत ३५७ पीडितांची ६ कोटी ४९ लाख ९६ हजार ७३१ रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी, 'फ्लायनॉट सास प्रा. लि.' कंपनीचे संस्थापक आणि कार्यरत कर्मचारी यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करत असतानाच, त्यांची १ कोटी २७ लाख २५ हजार ७८० रुपयांची मालमत्ता आतापर्यंत जप्त करण्यात आली आहे. यामध्ये सुमारे ४८ लाख २५ हजार ७८० रुपये किमतीच्या जंगम मालमत्तेचा आणि ७९ लाख रुपये किमतीच्या स्थावर मालमत्तेचा समावेश आहे. फसवणुकीच्या पैशातून घेतलेल्या या मालमत्तेवर टाच आणून, कायदेशीर प्रक्रियेद्वारे ही रक्कम पुन्हा बाधित विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी विशेष तपास पथकामार्फत (SIT) पुढील प्रक्रिया राबवली जात आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये 'इन्स्पायर' या आंतरराष्ट्रीय परिषद

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी- चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) यांच्या वतीने "इन्स्पायर २०२६" या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. १३ आणि १४ मार्च २०२६ रोजी करण्यात आले असल्याची माहिती एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

SBPIM's Inspire 2026 International Conference

P.C.E.T.'s Success Learn Lead S. B. PATIL INSTITUTE OF MANAGEMENT, PUNE ॥ सुप्रबन्धे राष्ट्र समृद्धि ॥

परिषदेत "शाश्वत जागतिक भविष्यासाठी व्यवसायिक नव संकल्पनांचा मार्ग"("RESPONSIBLE BUSINESS INNOVATION: DRIVING CHANGE FOR SUSTAINABLE GLOBAL FUTURE") या महत्त्वपूर्ण विषयावर देश विदेशातील संशोधक, प्राध्यापक, उद्योगतज्ज्ञ व विद्यार्थ्यांचा सहभाग राहणार आहे.

परिषदेचे उद्घाटन उद्योजक डॉ. प्रशांत पानसरे यांच्या हस्ते होणार आहे. भारत, अमेरिका, युनायटेड किंगडम, कॅनडा, फिलिपिन्स, थायलंड, लेबनॉन आणि दुबई आदी देशांतील संशोधकांनी यासाठी नोंदणी केली आहे. यामध्ये ५३८ लेखक सहभागी होणार आहे. तसेच २४० संशोधन लेख सादर करण्यात येणार आहेत.

परिषदेसाठी संस्थेच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली कुदरे, डॉ. दिलीप पवार, डॉ. योगेंद्र देवकर, डॉ. काजल माहेश्वरी आणि डॉ. संतोष शिंदे समन्वयक म्हणून काम करत आहेत. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

'पीएमपी' कर्मचाऱ्यांच्या फरकाचा प्रश्न मार्गी!

कामगार विश्व: भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पुणे महानगर परिवहन महामंडळातील ('पीएमपीएमएल') कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगानुसार थकीत असलेला फरक लवकरच मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ४०% हिस्स्यानुसार 56.10 कोटी रुपये त्वरित महामंडळाला दिली जाणार आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. महापालिका हिस्स्याची थकीत रक्कम 'पीएमपीएमएल'कडे वितरीत करण्यात येणार आहे.

सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर कर्मचाऱ्यांना फरक देण्याची प्रक्रिया हळूहळू सुरू झाली होती. यापूर्वी पहिल्या हप्त्याचे वितरण पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पुढाकारातून पूर्ण झाले होते, मात्र दुसऱ्या हप्त्याबाबत विलंब झाला होता. याबाबत भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांनी महापालिका प्रशासनाकडे पीएमपीच्या कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे.

तसेच, 'पीएमपीएमएल' कर्मचाऱ्यांच्या वतीने रवींद्र लांडगे, संतोष काळजे, दिनकर काळजे आणि उमेश धावडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्यासह चर्चा करून आमदार लांडगे यांनी पहिल्या फरकाच्या हप्त्याचे वितरण सुनिश्चित केले होते. त्यानंतर दुसऱ्या हप्त्यासाठी आयुक्त श्रावण हार्डीकर यांना सातत्याने सूचना देऊन रक्कम लवकर काढण्याचे प्रयत्न केले. संबंधित बैठकीत पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त, कामगार संघटना पदाधिकारी आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग होता. या चर्चेत निर्णय घेण्यात आला की, महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाचा फरक चार हप्त्यांमध्ये वितरीत केला जाईल.

आमदार लांडगे म्हणाले की, "दुसऱ्या हप्त्याबरोबरच उर्वरित दोन हप्तेसुद्धा लवकर वितरीत केले जातील. कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कम योग्य वेळी मिळावी. हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या हितासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. महामंडळाकडून 2025-26 च्या अंदाजपत्रकात आर्थिक तूट लक्षात घेऊन पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका स्वतःच्या उत्पन्नातून फरक भरून देणार आहेत.

> "पीएमपीएमएल'च्या सर्व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाचा फरक लवकर मिळेल यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न केले आहेत. दुसऱ्या हप्त्यासह उर्वरित हप्ताही लवकर वितरीत करण्यात येतील. कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कम योग्य वेळेत मिळणे हे आमचे प्राधान्य आहे. या निर्णयामुळे सर्व कर्मचारी समाधानी होतील आणि महामंडळाच्या कार्यप्रणालीत सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे.
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

पवना पाणीपुरवठा प्रकल्पाला राज्य शासनाच्या निधीची प्रतीक्षा!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पवना धरणातून से. क्र. २३ जलधारण केंद्र, निगडी पर्यंत पाईपलाईनमार्गे पाणीपुरवठा करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पुन्हा सुरू करण्यासाठी राज्य शासनाकडून अनुदानाची प्रतीक्षा सुरू आहे.

सदर प्रकल्पाचा आदेश ३० एप्रिल २००८ रोजी देण्यात आला होता. परंतु, प्रकल्प चालू असतानाच १ ऑगस्ट २०११ रोजी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बार टोलनाक्याजवळ रस्ता रोको आंदोलनात झालेल्या पोलिग-गोळीबारात तीन शेतक-यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, ज्यामुळे प्रकल्प तात्पुरता १० ऑगस्ट २०११ पासून थांबविण्यास भाग पाडले गेले

त्यावेळी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी १४ ऑगस्ट २०११ रोजी प्रकल्पाची पुढील अंमलबजावणी परिस्थितीनुसार आदेशान्वित ठेवण्याचे निर्देश दिले होते. या प्रकल्पाची प्राथमिक किंमत १.२९७.९२ कोटी रुपये होती.

स्थगिती नंतर ८ जानेवारी २०२३ रोजी उपसचिव यांनी प्रकल्पाचा तपशीलवार अहवाल (DPR) तयार करण्यास सांगितले आणि ५ फेब्रुवारी २०२५ रोजी तांत्रिक मान्यता मिळाली. तथापि, कालांतराने साहित्याच्या किमतीत वाढ झाल्यामुळे प्रकल्पाची एकूण खर्च अनुमानित रु. १०१५ कोटी पर्यंत वाढला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या व पवना नदी प्रदूषण लक्षात घेता, या प्रकल्पाद्वारे धरणातून पाणीपुरवठा होणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. शहरातील नागरिकांच्या आरोग्य आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल.

सध्या प्रकल्प पुन्हा सुरू करण्यासाठी जामनाकडून १०१५ कोटी रुपये शासकीय अनुदान मंजूर करण्याची विनंती करण्यात आली असून, राज्य शासनाच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात या प्रस्तावावर अंतिम निर्णय अपेक्षित आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस सुरूवात होताच, पिंपरी-चिंचवड शहरासाठी शुद्ध पाणी पुरवठा सुनिश्चित होईल, जे शहराच्या जलसंकटावर दीर्घकालीन उपाय ठरेल.

> "पिंपरी-चिंचवडच्या नागरिकांसाठी पाणीपुरवठा हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. शासनाने लवकरच आवश्यक अनुदान मंजूर करून प्रकल्प पुन्हा सुरू होईल, आणि नागरिकांना शुद्ध पाण्याचा सलग पुरवठा सुनिश्चित केला जाईल. आम्ही या प्रकल्पाच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत.
> – महेश लांडगे, आमदार, पिंपरी-चिंचवड, पुणे.

नागरिकांना केंद्रबिंदू मानून शहर सुधारण्याची संरचना!

सभापती संजय नाना काटे

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पवना धरणातून से. क्र. २३ जलधारण केंद्र, निगडी पर्यंत पाईपलाईनमार्गे पाणीपुरवठा करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पुन्हा सुरू करण्यासाठी राज्य शासनाकडून अनुदानाची प्रतीक्षा सुरू आहे.

शहर सुधारणा समितीची बैठक महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृहात समितीचे सभापती संजय नाना काटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीत शहर विकासाशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस माजी महापौर तथा नगरसदस्या वैशाली घोडेकर-लोंढे, नगरसदस्या वैशाली काळभोर, अर्चना सस्ते, नगरसदस्य डॉ. सुहास कांबळे, उत्तमराव केंदळे, अनंत कोऱ्हाळे यांच्यासह महापालिकेचे नगरसचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंह बन्सल, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शहरातील झोपडपट्टी भागातील नागरिकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे, पात्र लाभार्थ्यांना सदनिका उपलब्ध करून देणे, तसेच गरजू नागरिकांना वैद्यकीय मदत पोहोचविण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

'ICCC' प्रणालीची महापौरांकडून पाहणी!

शहरातील नागरी सेवांचे तांत्रिक पद्धतीने होणाऱ्या कामकाजाची घेतली माहिती

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निगडी येथील इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर (ICCC) येथे महापौर रवि लांडगे यांनी भेट देऊन शहरातील विविध नागरी सेवांचे तांत्रिक पद्धतीने करण्यात येणारे मॉनिटरिंग व नियंत्रण प्रणालीची सविस्तर माहिती घेतली.

पिंपर-चिंचवड महापालिकेच्या निगडी येथील इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर (ICCC) येथे महापौर रवि लांडगे यांनी भेट देऊन शहरातील विविध नागरी सेवांचे तांत्रिक पद्धतीने करण्यात येणारे मॉनिटरिंग व नियंत्रण प्रणालीची सविस्तर माहिती घेतली.

स्मार्ट सिटी संकल्पनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या या कमांड सेंटरच्या माध्यमातून शहरातील विविध नागरी सेवा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन तसेच आपत्कालीन परिस्थितीत देण्यात येणाऱ्या प्रतिसाद

प्रणालीचे एकाच ठिकाणाहून रिअल-टाईम निरीक्षण केले जाते. या प्रणालीमुळे शहरातील विविध घडामोडींवर त्वरित लक्ष ठेवणे तसेच संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करणे अधिक सुलभ झाले आहे.अशी माहिती कार्यकारी अभियंता अभिमान भोसले यांनी महापौर रवि लांडगे यांना दिली.

या भेटीदरम्यान महापौर रवि लांडगे यांनी शहरातील सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणा, वाहतूक नियंत्रण व्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन प्रणाली तसेच विविध विभागांचे रिअल-टाईम मॉनिटरिंग याबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. शहरातील नागरिकांना सुरक्षित, सुकर व अधिक कार्यक्षम नागरी सेवा देण्यासाठी इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

याशिवाय शहरातील विविध नागरी सेवांचे अधिक प्रभावी व्यवस्थापन, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद तसेच नागरिकांना अधिक सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरची कार्यक्षमता अधिक वाढविण्याबाबतचे निर्देश महापौर लांडगे यांनी दिले.

महापलिका अधिकाऱ्यांना सूचना...

पिंपरी चिंचवड महापा-लिकेच्या वतीने संपूर्ण शहरातील एकूण ८ हजार ७९० सीसीटीव्ही कॅमेरे नियंत्रण प्रणालीशी जोडण्यात आले असून त्यांच्या माध्यमातून शहरातील विविध प्रमुख चौक, रस्ते तसेच महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणांवर सतत देखरेख ठेवली जात आहे. त्यापैकी सध्या ३ हजार ८२७ कॅमेरे कार्यरत असून त्यांचे थेट प्रक्षेपण कमांड सेंटरमधून पाहता येते. तसेच काही कॅमेरे देखभाल, दुरुस्ती अथवा तांत्रिक कारणांमुळे तात्पुरते बंद असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. बंद असलेले कॅमेरे पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित तांत्रिक पर्यायांचा वापर करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. संबंधित कॅमेरे तातडीने सुरू करून शहरातील देखरेख व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.